## निशाणी क्र. ५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे सरंक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ अन्वये दाखल केला आहे. तिच्या म्हणण्याप्रमाणे तिचा पती सामनेवाला क्र.१ याने तिचा पत्नी म्हणून व तिच्या दोन मुलींचा केव्हाही सांभाळ केला नव्हता व नाही. उलट तीच तिचे लग्न झाल्यानंतर मुंबई येथे तिचे पतीसोबत राहत असताना स्वत:चा संसार वाचविणेकरिता व तिच्या मुलींचे पालनपोषण करणेकरिता दुस—या मालकांकडे घरकाम करून तिचे स्वत:चे व मुलींचे पालनपोषण करत होती. त्यावेळी सामनेवाला क्र.१ हा स्वत:ची कमाई दारू पिण्यामध्ये व मजा करण्यासाठीच घालवत होता. ती तिच्या माहेरी पोयरे येथे आल्यानंतर तिचा व तिच्या मुलींचा सांभाळ करणे तिला हलाखीचे झाले आहे. तिच्या आईचे देखील निधन १४ एप्रिल २०१७ रोजी झाले असून तिचा भाऊ हा देखील बेकार असून त्याचे देखील स्वत:चे उत्पन्नाचे असे कोणतेही साधन नाही. तिची माहेरची परिस्थिती एकदम हलाखीची असून तिला स्वत:चे व तिच्या मुलींचे पालनपोषण करणे कठीण होत आहे. अर्जदार हिचे मुंबई येथे स्वत:चे नावे कोणत्याही बॅकेत खाते नाही. अर्जदार हिचे स्त्रीधन म्हणून एक तोळयाचे सोन्याचे मंगळसूत्र, दोन ग्रॅम सोन्याची अंगठी, आठ ग्रॅम सोन्याची चेन, तीन ग्रॅम सोन्याची अंगठी, चार ग्रॅम सोन्याचे कानातील रिंग असे दागिने असून त्यापैकी मंगळसूत्र सामनेवाला क्र.१ याच्या ताब्यात आहे. तिचे स्वत:च्या नावे मुंबई येथे कोणत्याही बॅकेमध्ये खाते नसल्याने तिने त्यांच्या मुंबई येथील खोलीमध्ये पाण्याचे कनेक्शन घेणेकरिता सामनेवाली क्र.२ हिचे पी.एम.सी.बॅक गोरेगाव येथील शाखेमध्ये उर्वरित सर्व दागिने तारण ठेवून रू.२२,०००/—चे कर्ज घेतले असून त्याचे हप्ते तिने स्वत:च घरकाम करून भरले असून उर्वरित शेवटचे मार्च २०१७ व एप्रिल २०१७ चे हप्ते भरणेचे राहिले असून ते हप्ते सामनेवाला यांनी भरून तिचे स्त्रीधनाचे दागिने देखील त्यांच्या ताब्यातून

तात्काळ तिला मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे सामनेवाला क्र.१ याच्याकडून अर्जदार हीस अंतरिम पोटगी म्हणून रू.५०००/— व तिचे स्त्रीधनाचे दागिने सामनेवाला क्र.१ व २ यांच्याकडून तिला तात्काळ मिळावेत अशी विनंती अर्जदार हिने केली आहे.

२. सामनेवाला क्र.१ याने नि.क्र.१८ ला म्हणणे दाखल करून अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार तो सध्या इलेक्ट्रीक फिटींगची खाजगी कामे मोलमजुरीवर मिळतील तशी करतो. त्याला स्वत:चे दरमहा असे निश्चित कोणतेही उत्पन्न नाही. त्याची पूर्वीची नोकरी माहे जुलै २०१७ मध्ये संपली आहे. सध्या त्याला कोणतीही कायमस्वरूपी नोकरी नाही. तो अल्पशिक्षित आहे. त्याचे शिक्षण अपूर्ण असून देखील त्याने स्वत:चे अंगभूत कौशल्याचे जोरावर इलेक्ट्रीक फिटींगचे जुजबी ज्ञान मिळविले आहे आणि त्याद्वारे तो मोलमजुरीवर इलेक्ट्रीक फिटींगची कामे करून स्वत:ची गुजराण करतो. त्याला या व्यवसायातून अवघे सहा ते सात हजार रूपये उत्पन्न आहे. त्याला उत्पन्नातून त्याचे व त्याच्या वृध्द् आईचे म्हणजे सामनेवाली क्र.२ हिचे पालनपोषण करावे लागते. सामनेवाली क्र.२ हिच्या वृध्दापकाळामुळे तिला लागणा—या वैद्यकीय व औषधोपचारांचा खर्च देखील त्यालाच करावा लागतो. अर्जदाराने मागितलेली दरमहा रूपये ५०००/— ची पोटगी मंजूर झाल्यास सामनेवाला याच्या हातात अवघे सुमारे रूपये २०००/— एवढेच उत्पन्न शिल्लक राहणार आहे. एवढया अल्प उत्पन्नात तो मुंबई सारख्या ठिकाणी जगू शकणार नाही. अर्जदार हिने स्त्रीधनाचे दागिने ताब्यात मिळण्याची केलेली मागणी बेकायदेशीर व चुकीची आहे. अर्जदार अर्जात परस्परविरोधी व मोघम मजकूर लिहून न्यायालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहे. मुळातच अर्जदार हिने कथन केल्याप्रमाणे तिचे स्त्रीधन असणारे तथाकथित दागिने बॅकेचे ताब्यात आहेत. अर्जदारने अंतरिम पोटगीमार्फत सामनेवालेकडून सदर दागिन्यांच्या कर्जाचे हप्ते परस्पर फेडून

मिळावेत अशा अर्थाची अजब व चुकीची मागणी केली आहे. मुळातच तसे दागिने असल्याबाबत आणि ते बॅंकेत असल्याबाबत अर्जदाराने कोणताही पुरावा न्यायालयात सादर केला नाही. वादाकरिता क्षणभर अर्जदाराचे दागिने बॅंकेत असल्याचे गृहित धरले तरी ते त्याचा निश्चित किती हप्ता थकीत आहे व तो किती रूपये किंमतीचा आहे याबाबत अर्जदाराने काहीही तपशील तिचे अर्जात दिलेले नाहीत. अशा परिस्थितीत अर्जदाराला अंतरिम पोटगीच्या स्वरूपात बॅंकेचे हप्ते सामनेवालेकडून फेडून मिळण्याची तरतूद घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायदयामध्ये नाही. अर्जदारने कलम २३ चा चुकीचा अर्थ लावत धादांत खोटा मजकूर लिहून दागिन्यांची मागणी केली आहे. अर्जदार हिने तिचे अर्जात सामनेवाल्याच्या उत्पन्नाबाबत कोणताही तपशील दिलेला नाही. अर्जदार एकीकडे बॅंकेच्या कर्जाचे हप्ते स्वत: भरत असल्याचे विधान करते आहे व दुसरीकडे स्वत:ची परिस्थिती हलाखीची असल्याची विधाने करते आहे. अर्जदाराने अर्ज स्वच्छ हाताने केलेला नाही. अर्जदार सध्या गावी राहत नसून मुंबई येथे नोकरी करत आहे. अर्जदार हिला दरमहा रूपये दहा ते बारा हजार उत्पन्न आहे. अर्जदार हिने हा सर्व तपशील जाणीवपुर्वक तिचे अर्जात लपवला आहे. या सर्व कारणास्तव अर्जदार हिचा अर्ज खर्चासह फेटाळणेत यावा, अशी विनंती प्रस्तुत सामनेवाला याने केली आहे.

३. अर्जदार व सामनेवाला यांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. अर्जदार व सामनेवाला क्र.१ हे पती पत्नी आहेत, ते एकत्र राहत होते, त्यांना मुली आहेत, सध्या अर्जदार तिच्या मुलींसह माहेरी राहते याबाबत उभय पक्षकारांमध्ये वाद दिसून येत नाही.

५. अर्जदार हीने सामनेवाला यांनी तिच्या व तिच्या मुलींचा सांभाळ

केला नाही वगैरे बाबी शपथपत्राद्वारे सांगितल्या आहेत. अर्जदार हिने कथन केलेले सदर आरोप सामनेवाला यांनी नाकारले आहेत. मात्र सदरचे आरोप खरे आहेत किंवा खोटे आहेत हे पुरावा सादर केल्या नंतर अंतिम निर्णयाच्या वेळी उघड होणार आहेत. याक्षणी अर्जदार हिच्या शपथपत्रा आधारे असलेल्या कथनावरून सामनेवाला हा अर्जदार व तिच्या मुलींचे उदरनिर्वाह करत नाही असे प्रथमदर्शनी वाटते. अर्जदार ही आता माहेरी राहत असल्यामुळे तिच्या व तिच्या मुलींच्या उदरनिर्वाहाची सोय करण्याची जबाबदारी सामनेवाला क्र.१ यांची होती. मात्र अर्जदार माहेरी राहत असल्यापासून हे प्रकरण दाखल करेपर्यंत सामनेवाला क्र.१ याने त्यांच्या उदरनिर्वाहासाठी कोणतीही सोय केली नाही अगर आर्थिक मदत केली नाही असे दिसून येते. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम कलम ३ (अ) नुसार अर्जदार व तिच्या मुलींच्या उदरनिर्वाहासाठी अशी सोय न करणे हे देखील कृत्य कौटुंबिक हिंसाचाराच्या अंतर्गत येते. त्यामुळे या कारणास्तव सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिचा कौटुंबिक हिंसाचार केला असे प्रथमदर्शनी वाटते.

६. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम कलम २३ मधील तरतुदीनुसार अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्यास अर्जदार हिला तिच्या करिता व तिच्या मुलींच्या करता अंतरिम आर्थिक सहाय्य मिळण्याचा अधिकार आहे असे दिसून येते. वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे अर्जदार हिला तिच्या करिता व तिच्या मुलींच्या करता अंतरिम आर्थिक सहाय्य मिळणे आवश्यक आहे असे मला वाटते.

७. अर्जदार हिने सामनेवाला क्र.१ याच्या उत्पन्नाबाबत कसलाही पुरावा सादर केला नाही तरी देखील सामनेवाला क्र.१ याने त्याच्या

म्हणण्यामध्ये त्याला रूपये सहा ते सात हजार उत्पन्न आहे असे कबूल केले आहे. यावरून तो अर्जदार व तिच्या मुलींच्या उदरनिर्वाहाकरता आर्थिक सहाय्य देण्यास सक्षम आहे असे वाटते.

८. अर्जदार हिने प्रतिमहिना रू.५,०००/— आर्थिक सहाय्य मागितले आहे. मात्र प्रतिमहिना रू.५,०००/— आवश्यक असणा—या नेमक्या तिच्या कोणत्या गरजा आहेत याबाबत तिने स्पष्ट, सखोल पुरावा दिला नाही. त्यामुळे सामान्य व्यक्तीच्या आजच्या दैनंदिन गरजा, आवश्यक वस्तुंच्या किंमती पाहता व सामनेवाला क्र.१ याच्या उत्पन्नाचा व त्याच्यावरील त्याच्या आईच्या उदरनिर्वाहाच्या जबाबदारीचा विचार करता समानेवाला क्र.१ याने अर्जदार व मुलींकरिता रू.१,५००/— प्रतिमहिना आर्थिक सहाय्य करणेबाबत आदेश करणे न्यायोचित वाटते. परिणामी सदरचा अर्ज अंशत: मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. या अर्जावरील एकतर्फा आदेशान्वये सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिला मूळ अर्ज दाखल तारखेपासून रू.१०००/— प्रतिमहिना आर्थिक सहाय्य करण्याचा आदेश पारित करण्यात आला आहे. त्यामुळे आज रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी आजपासून होणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते.

९. अर्जात नमूद केलेले दागिने अर्जदाराचे होते व ते सामनेवाला अगर बॅकेच्या ताब्यात आहेत याबाबत कसलाही पुरावा सादर करण्यात आला नाही. त्यामुळे अर्जदारास दागिने परत देणेबाबतचा आदेश पारित करणे उचित वाटत नाही.

१०. सबब, वरील कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज अंशत: मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे :

# <u>आदेश</u>

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. आजपासून अंतिम निकालापावेतो सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिला तिच्या व मुलींच्या उदरनिर्वाहाकरिता प्रति महिना रूपये १,५००/— (रूपये एक हजार पाचशे) आर्थिक सहाय्य दयावे असा आदेश पारित करण्यात येतो.

३. दागिने ताब्यात मिळणेबाबतची मागणी नामंजूर करणेत येते.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/—
( गि. सु. माने )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, देवगड.

स्थळ : देवगड
दिनांक : २७/०७/२०१८